ॲग्रोमेटॲडवायझरी बुलेटीन
ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,
कृषि हवामानशास्त्र विभाग
कृषि महाविद्यालय, पुणे ४११ ००५
फोन : ०२०-२९५१६२६४
ई-मेल : amfupune@gmail.com

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २१/०७/२०२६

## जिल्हा : सोलापूर

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२१/०७/२०२६ ते २५/०७/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| पाऊस (मिमी) | 7.0 | 6.0 | 5.0 | 3.0 | 3.0 |
| कमाल तापमान (अं.सें.) | 32 | 33 | 34 | 35 | 35 |
| किमान तापमान (अं.सें.) | 24 | 24 | 25 | 25 | 26 |
| ढग स्थिती (आकाश) | 8 | 7 | 7 | 5 | 5 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 90 | 93 | 89 | 90 | 90 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 85 | 92 | 85 | 84 | 83 |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 22 | 22 | 22 | 21 | 18 |
| वाऱ्याची दिशा (अंश) | 259 | 252 | 244 | 242 | 253 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक २१ ते २५ जुलै, २०२६ दरम्यान तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • ज्या भागात ८० ते १०० मिमी पाऊस झालेला आहे तिथे शेतकरी बांधवांनी पुरेसा ओला व्यावर पेरणी करावी. पेरणी करताना महात्मा फुले कृषि विद्यापीठाने शिफारस केलेली बीजप्रक्रिया करावी.<br>• कमी पाऊस झालेल्या क्षेत्रात पेरणीची घाई करू नये व पुरेसा पाऊस झाल्यानंतरच पेरणी करावी.<br>• पावसाने ओढ दिल्यामुळे महिन्यामध्ये पेरणी झालेल्या उडीद , मूग, चवळी आणि तूर या पिकांमध्ये एक कोळपणी अथवा खुरपणी करण्याची शिफारस करण्यात येत आहे तसेच रोपांची प्रती हेक्टर योग्य संख्या राखण्यासाठी विरळणी करावी.<br>• खरीप हंगामातील रिकाम्या जमिनीत (नापेर) मूलस्थानी मृद व जलसंधारणासाठी मफु कृवि, राहुरीने विकसित केलेले ट्रॅक्टर चलीत फुले बंदिस्त वाफे तयार करणारे अवजार वापरून ६ x २ मीटर आकाराचे वाफे तयार करावेत जेणेकरून पावसाचा पडणारा प्रत्येक थेंब अडवून जमिनीत जिरवला असता जमिनीतील ओलाव्यात वाढ होऊन रब्बी पिकांचे उत्पन्न वाढण्यास मदत होते.<br>• हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामा नाच्या पूर्वानुमाना करिता 'मेघदुत' मोबाईल ॲपचा वापर करावा. मेघगर्जना व विजेच्या पूर्वानुमानाकरिता 'दामिनी' मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• कृषिविषयक माहितीसाठी, महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कृषिदर्शनीचा आणि सद्यस्थितीचा विचार करता आपत्कालीन पीक नियोजन पुस्तिकेचा एक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग करावा. |
| तूर + कोथिंबीर | पेरणी | आपत्कालीन पीक नियोजनासाठी बाजरी पिकामध्ये करावयाचा बदल तूर + कोथिंबीर (१:२) या प्रमाणात पेरणी योग्य पाऊस झाल्यास वापसा येताच बीजप्रक्रिया करून पेरणी करावी. |
| बाजरी व सुर्यफुल | पेरणी | जुलै च्या दुसऱ्या पंधरवड्यात आपत्कालीन पीक नियोज न उशिरा पेरणीसाठी पुरेसा ओला व्यावर पेरणी बीजप्रक्रिया करून उरकून घ्यावी. |
| चवळी | पीक वाढीची अवस्था | रस शोषणाऱ्या किडींच्या नियंत्रणासाठी , प्रति लिटर पाण्यामध्ये ५ ग्रॅम या प्रमाणात 'लेकॅनिसिलियम लेकॅनी' (पूर्वीचे 'व्हर्टिसिलियम लेकॅनी') या जैविक बुरशीनाशकाचे मिश्रण फवारावे. |
| ऊस | पीक वाढीची अवस्था | खोड किडीच्या जैविक नियंत्रणासाठी ट्रायकोग्रामा चिलोनिस (ट्रायकोकार्ड) ५ ते ६ ट्रायकोकार्ड १५ दिवसाच्या अंतराने प्रति हेक्टरी वापरावे तसेच ५ कामगंध सापळे (इ.एस.बी. ल्यूर) प्रति हेक्टरी वापरावे. |
| मुग/उडीद | पीक वाढीची अवस्था | शेतातील रोगग्रस्त झाडे उपटून टाका आणि ती नष्ट करा. गरजेप्रमाणे आंतरमशागत निंदणी/कोळपणी करून पिक तण विरहित ठेवावे. |
| हुमणी कीड | किडीचे नियंत्रण | हुमणीचे भुंगेरे सुर्यास्तानंतर बाभूळ, बोर, लिंब या झाडांवर पाने खाण्यासाठी गोळा होतात. अशा झाडांच्या फांद्या रात्री काठीच्या सहाय्याने हलवून खाली पडलेले भुंगेरे गोळा करावेत व रॉकेल मिश्रित पाण्यात टाकून मारावेत. हा उपाय शेतकऱ्यांनी सामुदायिकरित्या करावा. त्यामुळे अंडी घालण्यापूर्वीच भुंगेऱ्यांचा नायनाट होईल. हुमणी अळीच्या जैविक नियंत्रणासाठी मेटारिझीयम ॲनिसोप्ली परोपजीवी बुरशी २० कि. प्रति हेक्टर जमिनीत मिसळावे (शेणखतामध्ये मिसळून टाकता आल्यास उत्तम). |
| केळी | पीक वाढीची अवस्था | लागवडीसाठी कंद मुनवे निरोगी आणि जातिवंत बागेतूनच निवडावे. ॲझोस्पिरीलम - २५ ग्रॅम व पी.एस.बी.-२५ ग्रॅम/ झाड, केळी लागवडीच्या वेळी शेणखतात मिसळून द्यावीत. गंधक २० ग्रॅम शेणखतात आठवडाभर मुरवून (१:१० प्रमाणात) प्रति झाड दोन समान हप्त्यात लागवडीच्यावेळी व लागवडीनंतर १६५ दिवसांनी द्यावे. वादळी वाऱ्यापासून बागेच्या संरक्षणासाठी सजीव कुंपणाचा वापर करावा. |
| आंबा | पीक वाढीची | नवीन लागवड केलेल्या फळबागेतील पाण्याचा निचरा करावा . ज्या बागेत छाटणी झालेली आहे तिथे प्रतिबंधात्मक |

| | | |
|---|---|---|
| | अवस्था | उपाय म्हणून कीटकनाशक व बुरशीनाशकाची फवारणी करावी. |
| **पपई** | पीक वाढीची अवस्था | पपई मध्ये पीथियम सॉफ्ट रोगाच्या नियंत्रणासाठी रेडो मिल गोल्ड २ ग्रॅम प्रति लिटर पाण्यातून आळवणी करावी. |
| **सिताफळ** | पीक वाढीची अवस्था | सिताफळातील पिठ्या ढेकूण या किडीच्या नियंत्रणासाठी लेकेनोसिलियम लेकॅनी (व्हर्टीसिलियम लेकॅनी) हे जैविक बुरशीनाशक ५ ग्रॅम अधिक फिशऑईल रोझीन सोप ५ ग्रॅम किंवा मेटारायझीयम ५ ग्रॅम आणि ५ मिली दुध प्रति लिटर पाणी याप्रमाणात आर्द्रतायुक्त हवामान असताना फवारणी करावी. |
| **जनावरांचे व्यवस्थापन** | | पावसाळयात जनावरांना खुरामध्ये जखमा होवून त्या चिघळू शकतात. यासाठी त्यांना वाळलेल्या जागेत ठेवून त्या जखमा पोटॅशिअम परमॅग्नेटने धुवून त्यावर मलमपटटी करावी. |
| ***टिप : शेतकरीबंधूनी किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्य ती खबरदारी/ काळजी धेऊन किसान कवच बॉडीसूटचा वापर करावा.** | | |

**स्त्रोत : १) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.**
**२) मागील हवामान : -**
**ठिकाण : कृ.म.वि., पुणे . दि. : २१.०७.२०२६**

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे,ऐएमएफयु, पुणे तथा**
**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**